स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

सार्वजनिक वितरण प्रणालीचे विश्लेषण : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा
(2012-2013 ते 2021-2022)

संशोधक

कु.आकांक्षा दिपक भोरे

एम. ए.,सेट (अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ.डी.डी.भोसले

अर्थशास्त्र विभाग,

यशवंत महाविद्यालय नांदेड.

संशोधन केंद्र

यशवंत महाविद्यालय, नांदेड – 431601

25 मार्च 2022

गोषवारा(Abstract) :

मानवविज्ञान विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोध प्रबंधासाठी संशोधकाने 'सार्वजनिक वितरण प्रणालीचे विश्लेषण : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा (2012-2013 ते 2021-22)' हा विषय निवडला आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने सार्वजनिक वितरण प्रणालीचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय महत्त्व समजून घेऊन, नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीचे विश्लेषण करणार आहे. यात संशोधकाने नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीचे तालुकानिहाय, वर्षनिहाय अध्ययन करण्याचे निश्चित केले आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे पुरविल्या जाणाऱ्या योजनांची कामगिरी यांचे अध्ययन केले जाणार आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे मिळणाऱ्या लाभांचे आणि समस्यांचे अध्ययन करून त्यावर उपाययोजना सुचविल्या जाणार आहेत.

सदरील संशोधनात संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा उपयोग करण्यात येणार आहे. प्राथमिक सामग्रीसाठी प्रश्नावली तसेच अनुसुची तयार करून मुलाखती घेण्यात येणार असून, यासाठी यादृच्छिक नमुना पद्धतीचा अवलंब करून नमुन्यांची निवड करण्यात येणार आहे. संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी विविध सांख्यिकीय तंत्रांचा वापर करण्यात येणार आहे. अशाप्रकारे उपरोक्त संशोधन पद्धतीचा अवलंब करून नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

सार्वजनिक वितरण प्रणालीचे विश्लेषण : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

(2012-2013 ते 2021-2022)

1) प्रस्तावना (Introduction) :

मानवाच्या आर्थिक विकासाच्या इतिहासाचे अध्ययन केले असता आपणास लक्षात येते की, अर्थशास्त्रातील संकलपना सभोवतालच्या परिस्थितीतुनच निर्माण होतात. प्राचीन काळात उद्योग नव्हतेच, लोक फकत शेती करत असत. श्रीमंत लोक त्यांच्या जमिनीवर गरिबांना कामावर ठेवून त्यांच्याकडून शेती कसून घेत असत. कालांतराने या समाजव्यवस्थेत काही गैरप्रकार निर्माण झाले. तेव्हा हा गैरप्रकार थांबवण्याच्या दृष्टिकोनातूनच उदयास आलेली संकल्पना म्हणजेच समाजकल्याण होय.

सामाजिक कल्याणासाठी प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत, युरोप खंडापासून ते आशिया खंडा पर्यंत अनेक महामानवांनी अथक प्रयत्न केले आहेत. प्लेटो यांनी 'रिपब्लिक' या ग्रंथात आदर्श समाजाचे चित्र रंगवले आहे. ज्यात त्यांनी वैयक्तिक हितापेक्षा ही पुढे जाऊन समाजहित साध्य करण्याच्या दृष्टीकोनातून समाज कल्याण ही संकल्पना अप्रत्यक्षपणे निदर्शनास आणली. नंतरच्या काळात ॲडम स्मिथ, कार्ल मार्क्स, अर्थर पिगु, इत्यादी अर्थशास्त्रज्ञांच्या विचारातून सामाजिक कल्याणाचा संदर्भात झालेले विवेचन दिसून येतेच. भारता संदर्भात सामाजिक कल्याणाचे अध्ययन केले असता. आपणास असे दिसून येते की, प्राचीन काळ म्हणजे अगदी रामायण-महाभारत युगापासून ते मध्ययुगीन काळातील राजे चंद्रगुप्त मौर्य, पौरस, विक्रमादित्य, पृथ्वीराज चव्हाण, महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज, इत्यादी राजांचा राज्यकारभार समाजाला केंद्रबिंदू मानून समाजहिताच्या दृष्टिकोनातूनच केला जात असे. तर आधुनिक काळातील अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन, जगदीश भगवती, अभिजित बॅनर्जी इत्यादींच्या कामगिरीतून सामाजिक कल्याणाचे महत्त्व विशद होते.

नोबेल पारितोषिक विजेते प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथ 'पॉव्हर्टी अँड फेमिन' यात असे म्हणतात की, "पोषक अन्न मिळविणे ही मनुष्याची केवळ गरज नसून तो त्यांचा अधिकार आहे". तेव्हा प्रत्येकापर्यंत अन्नाची पोहोच व्हावी या दृष्टिकोनातून सार्वजनिक वितरण प्रणालीची स्थापना करण्यात आली. या अंतर्गत सर्व गरीब कुटुंबांना जीवनावश्यक, पोषक अन्नधान्य व काही भौतिक वस्तू स्वस्त दरात वितरित केल्या जातात.

2) पार्श्वभूमी (History) :

अमर्त्य सेन म्हणतात, "आपण इतिहासात जगलं नाही पाहिजे पण इतिहास जाणून घेतल्याशिवाय आपण जगू शकत नाही." तेव्हा सार्वजनिक वितरण प्रणालीचे पार्श्वभूमी समजून घेऊ.

इ.स. 1939 ते 1945 या कालावधीत झालेले दुसरे महायुद्ध आणि त्याचे प्रतिकूल परिणाम संपूर्ण जगाला सोसावे लागले. या काळात अन्नधान्याचा खूप तुटवडा निर्माण झाला. भारत देखील या समस्येपासून वंचित नव्हता. तसेच बंगाल प्रांतात मोठा दुष्काळ पडला, अन्नधान्याची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी परप्रांतातून अन्नसाठा मागवला गेला. तत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण मिळेपर्यंत गरजूंना अन्नधान्याचा पुरवठा करणे, अन्नधान्य समस्यांचे निराकरण करणे यासाठी अन्न विभागाची स्थापना केली.

अशा प्रकारे युद्धजन्य आपात्कालीन परिस्थितीत सार्वजनिक वितरण प्रणालीची स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अन्नधान्य विभागाचे पुनर्गठन करण्यात आले. सन 1960 च्या दशकात हरित क्रांतीनंतर या विभागाचे महत्त्व विस्तार यात वृद्धी होत गेली.

3) सार्वजनिक वितरण प्रणालीचा अर्थ (Meaning) :

सार्वजनिक वितरण प्रणाली म्हणजे समाजातील दुर्बल घटकांना अत्यावश्यक असणारे अन्नधान्य व बिगर अन्नधान्य घटक वाजवी दरात उपलब्ध करून देणारी यंत्रणा होय. या प्रणालीद्वारे वस्तूंच्या वाढीव किंमतीपासून गरीब उपभोकत्यांचे रक्षण केले जाते. त्यांची किमान पोषण पातळी कायम राखण्याचा प्रयत्न केला जातो. ही प्रणाली राबविण्यासाठी सरकार उत्पादकांकडून व व्यापाऱ्यांकडून आधीप्राप्ती दराने किंमतीने जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करते. खरेदी केलेल्या वस्तू स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून उपभोक्त्यांना वाजवी दरात उपलब्ध करून देते. त्यानुसार त्यांना लाभार्थ्यांना शिधापत्रिका वाटप केले जाते.

भारतात सन 1960 मध्ये विधीवत पद्धतीने सुरू झालेली सार्वजनिक वितरण प्रणाली (public distribution system) देशातील सर्वच लोकांना उपलब्ध असणारी होती.

सन 1992 पासून पुनर्निर्मित सार्वजनिक वितरण प्रणाली (Revamped Public distribution system) लागू करण्यात आली. यानुसार दारिद्र्याचे प्रमाण जास्त असणाऱ्या दुर्गम भागावर व डोंगराळ भागावर जास्त लक्ष देण्यात आले. सन 1997 पासून उद्देशात्मक सार्वजनिक वितरण प्रणाली (Targeted Public distribution system) लागू करण्यात आली. यात तिहेरी शिधापत्रिका योजना सुरू करण्यात आली.

सन 2000 पासून अंत्योदय अन्न योजना व अन्नपूर्णा योजना लागू करण्यात आल्या. यानुसार गरिबातील अतिगरीब कुटुंबांचा समावेश अंत्योदय योजनेत करण्यात आला तर गरीब वरिष्ठ नागरिकांचा समावेश अन्नपुर्णा योजनेअंतर्गत करण्यात आला.

सन 2013 पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम लागू करण्यात आला. यानुसार लाभार्थ्यांचे दोन गटात वर्गीकरण करण्यात आले. अंत्योदय अन्न योजना (AAY) आणि प्राधान्य गृह धरण (PHH). अंत्योदय गटातील लाभार्थ्यांना 35 किलो अन्नधान्य प्रतिमहा प्राप्ती होते. तर प्राधान्य गृह गटातील लाभार्थ्यांना 5 किलो प्रतिमहा, प्रतिव्यक्ती अन्नधान्य प्राप्ती होते. त्यांना तीन रंगाचे शिधापत्रिका वितरीत केल्या जातात.

सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत शिधापत्रिकेचे प्रकार

पिवळे शिधपत्रक		**केशरी शिधापत्रक**				**शुभ्र शिधापत्रक**
गरिबी रेषेखालील कुटुंब	अंत्योदय अन्न गटातील	प्राधान्य क्षेत्र गट	गरिबी रेषेवरील शेतकरी	बिगर प्राधान्य क्षेत्र गट	अन्नपूर्ण योजना गट	सधन कुटुंब गट

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणालीनुसार पिवळ्या रंगाचे शिधापत्रक गरिबी रेषेखालील कुटुंबांना व अंत्योदय अन्नगटातील कुटुंबांना दिले जाते. ज्यांचे मासिक उत्पन्न 15000 रु. व त्यापेक्षा कमी आहे. अशांचा समावेश गरिबी रेषेखालील कुटुंबांमध्ये होतो. तर त्यांच्यातील अत्यंत गरीब यांचा समावेश अंत्योदय अन्न योजनेत केला जातो.

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणालीनुसार केशरी रंगाच्या शिधापत्रिका हे ज्यांचे उत्पन्न 15000 रुपयांपेक्षा जास्त ते 100000 रूपर्यंत असते अशांना दिले जाते. यात प्राधान्य क्षेत्र गट, बिगर प्राधान्य क्षेत्र गट, गरिबी रेषेवरील शेतकरी आणि अन्नपूर्ण योजना यांचा समावेश होतो. अन्नपूर्णा योजनेअंतर्गत वय वर्ष 65 किंवा त्यावरील निराधार स्त्री-पुरुषांना दरमहा दहा किलो धान्य मोफत देण्यात येते.

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणालीनुसार शुभ्र शिधापत्रिका हे सर्व साधारणतः सधन कुटुंबातील व्यक्तींना दिले जाते. या कुटुंबातील व्यक्ती स्वस्त धान्य दुकानातील धान्य घेत नाहीत.

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणाली नुसार विविध शिधापत्रिकांचे वाटप केले जाते. त्यासाठी उपरोक्त व्यतिरिक्त इतरही काही निकषांचा समावेश होतो. अशा प्रकारे आपण सार्वजनिक वितरण प्रणालीचा अर्थ समजून घेतला आहे.

4) संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of research) :

i. नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीचे तालुकानिहाय व वर्षनिहाय अध्ययन करणे.
ii. नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत वितरित केल्या जाणाऱ्या अन्नधान्याचे नियतन व उचल यांचे विश्लेषण करणे.
iii. नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीच्या कार्यप्रणालीचे अध्ययन करणे.
iv. नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे मिळणाऱ्या लाभांचे अध्ययन करणे.
v. नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरणप्रणालीतील दोष आणि समस्यांचे अध्ययन करून त्यावर उपाययोजना सुचविणे.
vi. नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे अमलात आणलेल्या विविध योजनांच्या कामगिरीचे अध्ययन करणे.

5) संशोधनाची गृहितकृत्ये (Hypotheses of research) :

i. नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कामगिरीत तालुकानिहाय व वर्षनिहाय लक्षणीय फरक दिसून येतो.
ii. नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणाली आणि गरिबांची अन्न सुरक्षितता यांच्यात लक्षणीय संबंध आहे.
iii. नांदेड जिल्ह्यात अन्नधान्यासाठी केली जाणारी मागणी आणि सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे केला जाणारा अन्नधान्याचा पुरवठा यांच्यात समतोल आहे.
iv. नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत करण्यात आलेल्या तरतुदीद्वारे लाभार्थी समाधानी आहेत.
v. अन्नपूर्णा योजना नांदेड जिल्ह्यात आपली उद्दिष्टे कार्यक्षमपणे पूर्ण करीत आहे.
vi. नांदेड जिल्ह्यात रास्त धान्य दुकानांच्या कार्यप्रणाली मध्ये तालुकानिहाय लक्षणीय फरक दिसून येतो.
vii. अंत्योदया अन्न योजना नांदेड जिल्ह्यात आपली उद्दिष्टे कार्यक्षमपणे पूर्ण करीत आहे.

6) संशोधन पद्धती (Research methodology) :

प्रस्तुत संशोधन विषय संख्यात्मक आणि गुणात्मक या दोन्ही प्रकारात मोडते. म्हणून प्रस्तुत विषयाचे अध्ययन करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम तथ्य सामग्रीचा उपयोगकरून विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. यासाठीची संशोधन पद्धती पुढीलप्रमाणे असेल.

6.1) तथ्य संकलन (Data collection) :

प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची इ. सांख्यिकीय साधनांचा उपयोग करून, प्रस्तुत संशोधन समस्येसंदर्भात माहिती संकलित करण्यात येणार आहे.

दुय्यम तथ्य संकलनासाठी प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने विविध शासकीय अभ्यास गट आणि समित्यांचे अहवाल, जिल्हा आर्थिक समालोचन यांचे विभिन्न वर्षाचे अहवाल, तहसिल आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याद्वारे प्रकाशित करण्यात येणारी पुस्तिका आणि दस्तऐवाज याच बरोबर प्रस्तुत विषयावरील संदर्भग्रंथ, संशोधन नियतकालिकांमध्ये प्रकाशित लेख, विविध मासिके, पाक्षिके, साप्ताहिक, दैनिक वर्तमानपत्रे, विभिन्न संकेतस्थळे यांचा उपयोग करण्यात येणार आहे.

6.2) तथ्यांचे विश्लेषण (Data analysis) :

उपरोक्त प्रमाणे प्राथमिक आणि दुय्यम तथ्य सामग्रीच्या आधारे संकलित करण्यात आलेल्या तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी t-test, x^2-test, ANOVA, समाश्रायण रेषा इत्यादींचा आवश्यकतेनुसार उपयोग करण्यात येणार आहे. याचबरोबर तक्ता व आलेख या सारख्या सांखिकीय तंत्रांचा अवलंब करण्यात येणार आहे. तथ्य संकलनासाठी यादृच्छिक नमुना पद्धतीच्या सहाय्याने नमुने घेण्यात येतील.

6.3) संशोधन कालावधी (Time period of research) :

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी सन 2012-2013 ते सन 2021-2022 असा एकूण दहा वर्षांचा सलग कालावधी देण्यात आला आहे.

6.4) संशोधन विषयाच्या मर्यादा (Limitations of research subject) :

प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीचे अध्ययन करण्यात आले आहे म्हणून प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.

प्रस्तुत संशोधनात सन 2012- 13 ते सन 2021- 2022 या कालखंडासंदर्भात अध्ययन केले जाणार आहे. म्हणून इतर कालावधीसाठी अध्ययनाचे निष्कर्ष लागू होतीलच असे नाही.

संशोधनात प्राथमिक सामग्रीचा देखील उपयोग करण्यात आला आहे. तेव्हा मुलाखती घेताना अंदाजे माहिती सांगणे, पूर्वग्रह दूषित असणे अशा काही मर्यादा पडतात.

7) विषयाचे महत्त्व (Importance of research Topic) :

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. त्यातही अन्न हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. याचाच विचार करून संयुक्त राष्ट्र संघाने, सर्व लोकांना रोज पुरेसे, सुरक्षित व पोषक अन्न उपलब्ध व्हावे या उद्दिष्टाला समोर ठेवून अन्न व कृषी संघटना (FAO) आणि जागतिक आरोग्य संघटना (WHO) या आंतरराष्ट्रीय संघटनांची स्थापना केली. यांच्या अध्ययननुसार, "आजही जगात उपासमारीमुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या रोगांमुळे होणाऱ्या एकूण मृत्युंपेक्षा जास्त आहे". म्हणून जागतिक शाश्वत विकासाच्या ध्येयांमध्ये (SDG) भूक संपविणे, अन्नसुरक्षा आणि सुधारित पोषण मिळवणे यांचा समावेश करण्यात आला आहे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. परंतु मोठ्या प्रमाणातिल लोकसंख्या वृद्धीमुळे देशात अन्नधान्याची टंचाई निर्माण होत होती. तेव्हा याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी देशपातळीवर सार्वजनिक वितरण प्रणाली अस्तित्वात आली. या अंतर्गत भारतीय अन्न महामंडळ संपूर्ण देशासाठी अन्नधान्याचा पुरवठा करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत असते. तर महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागा अंतर्गत उपलब्ध अन्नपुरवठा जिल्ह व तालुका निहाय स्वस्त धान्य दुकानांपर्यंत पोहचवण्याचे कार्य करते. तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानांमार्फत ते धान्य गरजू घटकांपर्यंत पोहचवण्याचे कार्य केले जाते. अशाप्रकारे सार्वजनिक वितरण प्रणालीचे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, क्षेत्रीय व स्थानिक पातळीवरील महत्त्व दिसून येते.

मराठवाडा विभागांमध्ये नांदेड जिल्हा इतर जिल्ह्यांच्या तुलनेत मागासलेला आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणाली कशा पद्धतीने कार्य करते, कशा प्रकारे अमलात आणली जाते, हे अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

8) प्रकरणांची रूपरेषा (Chapter scheme) :

- **प्रकरण पहिले: प्रस्तावना आणि संशोधन पद्धती**.

या प्रकरणामध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीचा अर्थ, इतिहास, वैशिष्ट्ये, स्वरूप कार्यप्रणाली तसेच भारतातील, महाराष्ट्रातील व नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीची स्थिती स्पष्ट केली जाईल.

तसेच अध्यायन विषयाची निवड, महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतकृत्य, संशोधन पद्धती, तथ्य संकलन, तथ्य विश्लेषण साधने,अर्थपूर्णता आणि लक्षणयत्ता पातळीचे निर्धारण, संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा या सर्व घटकांचे विश्लेषण केले जाईल.

- **प्रकरण दुसरे: नांदेड जिल्हा एक दृष्टिक्षेप**.

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान, दिशा, जिल्ह्याचा नकाशा जिल्ह्याचा समग्र भौगोलिक आढावा स्पष्ट करण्यात येणार आहे. तसेच नांदेड जिल्ह्याची आर्थिक स्थिती, वैशिष्ट्ये, निवडक सांखिकी माहिती स्पष्ट केली जाणार आहे.

- **प्रकरण तिसरे: संशोधन साहित्याचा आढावा**.

प्रस्तुत प्रकरणात सदरील संशोधन विषयाशी संबंधित विविध संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे. हा आढावा घेत असताना संशोधन साहित्याचे चार भागात वर्गीकरण केले आहे.
भाग 1 याअंतर्गत सरकारद्वारे स्थापित समिती आणि अभ्यास गट यांच्याद्वारे सादर केलेले अहवाल यांचे विवेचन केले आहे.
भाग-2 अंतर्गत सदरील संशोधन विषयाशी संबंधित वेगवेगळे संशोधन नियतकालिके, प्रकाशित झालेल्या शोध प्रबंधाचा संक्षिप्त आढावा घेण्यात येणार आहे.
भाग-3 या अंतर्गत विविध विद्यापीठांमध्ये सादर करण्यात आलेली अप्रकाशित शोध प्रबंध व त्यातील निष्कर्ष आणि शिफारसींचा आढावा घेण्यात येणार आहे.
भाग -4 या अंतर्गत अध्ययन विषयाशी संबंधित ग्रंथांचे संशिप्त स्वरूपात विश्लेषण केले जाणार आहेत.

- **प्रकरण चौथे: नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीचे विश्लेषण**.

यांप्रकरणा अंतर्गत प्राथमिक तथ्यानंद्वारे संकलित करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे. तसेच द्वितीय सामग्रीद्वारे संकलित करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण संशोधन पद्धती वापरून करण्यात येणार आहे.

- **प्रकरण पाचवे : निष्कर्ष व शिफारशी**.

प्रस्तुत प्रकरणात सार्वजनिक वितरण प्रणाली संदर्भात केलेल्या तथ्य संकलनातून मिळालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष यांची मांडणी करण्यात येणार आहे. तसेच गृहितकृत्यांची पडताळणी करून संशोधनाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण शिफारशी करण्यात येणार आहेत.

9) नियोजित आराखडा (Year wise plan of work) :

प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी व आकलन याच बरोबर प्रबंध **लेखनाचे काम यासाठी वर्ष निहाय नियोजित आराखडा खालीलप्रमाणे राहील:**

प्रथम वर्ष: प्रथम वर्षात विषयाच्या अनुषंगाने अध्ययन सामग्रीचे संकलन, प्राथमिक प्रकरणाची रूपरेषा व मांडणी करणे याचबरोबर संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

द्वितीय वर्ष : द्वितीय वर्षात तथ्य संकलन करून संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण इत्यादी कार्य करण्यात येणार आहेत.

तृतीय वर्ष : तृतीय वर्षामध्ये गृहितकृत्यांची पडताळणी, निष्कर्ष आणि शिफारसी मांडण्यात येणार आहेत. संपूर्ण प्रकरणांची एकत्रित बांधणी करून, प्रबंध विद्यापीठात सादर करण्यात येणार आहे.

10) अपेक्षित परिणाम (Expected Outcomes) :

1. नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेची कामगिरी यात तालुका निहाय व वर्ष निहाय लक्षणीय फरक दिसून येतो.
2. नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्था कार्यपूर्ती मध्ये यशस्वी झाली आहे.
3. नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत केल्या जाणाऱ्या अन्नधान्याच्या वाटपात गरीबी रेषेखालील कुटुंबांची उचल सर्वाधिक आहे.
4. नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणाली आणि गरिबांची अन्न सुरक्षितता यांच्यात लक्षणीय संबंध आहे.
5. नांदेड जिल्ह्यात अन्नधान्यासाठी केली जाणारी मागणी आणि सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे केला जाणारा अन्नपुरवठा यांच्यात समतोल आहे.
6. नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत करण्यात आलेल्या तरतुदी द्वारे लाभार्थी समाधानी आहेत.
7. अन्नपूर्णा योजना नांदेड जिल्ह्यात आपली उद्दिष्टे कार्यक्षमपणे पूर्ण करीत आहे.
8. नांदेड जिल्ह्यात रास्त धान्य दुकानांच्या कार्यप्रणाली मध्ये तालुका निहाय लक्षणे फरक दिसून येतो.
9. शिवभोजन योजना नांदेड जिल्ह्यात आपली उद्दिष्टे प्रभावीपणे पूर्ण करीत आहे.

संदर्भग्रंथ सूची (bibliography) :

संदर्भ (References)

1. आगलावे, प्र. (2010). *संशोधन पद्धती व तंत्रे*, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
2. गोडबोले, अ. (2009). *अर्थात अर्थशास्त्रातील रंजक सफर व शोध*, राजहंस प्रकाशन, पुणे.
3. दत्त, रु. आणि सुंदरम, के. पी. (2002). *भारतीय अर्थव्यवस्था*, चांद प्रकाशन, नवी दिल्ली.
4. बोधनकर, सु. आणि अलोनी, वि. आणि कुलकर्णी मृ. (1999). *सामाजिक संशोधन पद्धती*, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
5. मिश्रा, जे.पी. (2006). *भारतीय अर्थव्यवस्था*, साहित्य भवन प्रकाशन, आग्रा.
6. Banerjee, A. and Dufloo, E. (2012). *Poor economics* Economics public affairs. New York.
7. Majumdar, B.(2007). *political economy and public distribution system in India,* concept publishing, Delhi.
8. Mishra, B. (1985). *Economics of public distribution system in food grains*, South Asian books, Delhi.
9. Ronald, H. (2015). *The Oxford handbook of food politics and society*, Oxford University press, England.
10. Swaminathan, M. (2003). *Weaking welfare*, Manohar publisher and distributor, Delhi.

संशोधन नियतकालिके (Research Journals):

Chandanshiv, M. M. and Narwade, S.S. (2014). *Evaluation of PDF in Maharashtra or case study* , International multi disciplinary journal.

Khera, R. (2018). *Trends in diversion of grains from public distribution system*, economic and political weekly.

योजना, माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकार विधान.

अहवाल (Reports):

जिल्हा, सामाजिक व आर्थिक समालोचन नांदेड जिल्हा, (विविध अंक 2012-2013 ते 2021-2022), माहिती व प्रसारण मंत्रालय महाराष्ट्र सरकार.

संकेतस्थळे (Websites)

1. https://dfpd.gov.in
2. https://en.m.wikipedia.org
3. https://fao.org
4. https://hadesh.maharashtra.gov.in

5. https://hood.gov.in
6. https://nfsa.gov.in
7. https://shodhganga.inflibnet.ac.in
8. https://ww.who.int

संशोधक

कु.आकांक्षा दिपक भोरे

एम.ए., सेट (अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. डी .डी .भोसले

अर्थशास्त्र विभाग,

यशवंत महाविद्यालय, नांदेड.